वर्ष १२ वे * अंक ४० वा * गुरुवार, दिनांक ०६ मार्च २०२५ ते बुधवार, दिनांक १२ मार्च २०२५ * रायगड * महाराष्ट्र * मुल्य २ रुपये * पृष्ठे ४

रायगड लोकधारा
बातम्या आणि जाहिरातीसाठी
संपर्क साधा :- ८३६९३९४३७२
सा.रायगड लोकधारा वृत्तपत्र /
रायगड लोकधारा न्यूज चॅनल

अन्यायाला वाचा फोडणारे....
ज्वलंत एकमेव वृत्तपत्र....
रायगडसह मुंबई, नवी मुंबई मधून प्रकाशित...!
शब्दांना लेखणीची धार..!

# रायगड लोकधारा

RNI No. MAHMAR/2013/48622
संपादकः विजय चंद्रकांत गायकर

## कामोठे उड्डाण पुलावर चार वाहने धडकून अपघात

**पनवेल ।** पनवेलहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या कारचालकाने अचानक ब्रेक दाबल्याने पाठीमागून येणाऱ्या कार एकमेकांवर धडकल्याची घटना घडली. सायन-पनवेल मार्गावरील कामोठे येथील उड्डाणपुलावर झालेल्या या अपघातात कुणीही जखमी झाले नाही.या अपघातातील टी परमिट वॅगनार कार मुंबईच्या दिशेने जात होती. ही कार कामोठे उड्डाणपुलावर आली असताना, चालकाने अचानक ब्रेक दाबून कार थांबवली. त्यामुळे त्याच्या पाठीमागून भरधाव वेगाने येणारी होंडा सिटी कार त्याच्यावर धडकली. त्यानंतर त्या कारवर त्याच्या पाठीमागून येणारी इतर दोन गाड्या एकमेकांवर धडकल्या. या चारही वाहनांचे नुकसान झाले. या अपघातामुळे चारही वाहने रस्त्यात अडकून पडल्याने सायनपनवेल मार्गावर काही काळ वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. या अपघाताची माहिती मिळताच कळंबोली वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन प्रथम अपघातग्रस्त वाहने बाजुला काढून वाहतुक सुरळीत केली.

## सुधारित शुल्कातून शेतकऱ्यांना मोठा दिलासा

### आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नांना यश

**सा.रायगड लोकधारा वृत्त/**

**पनवेल प्रतिनिधी :** नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र म्हणजेच नैना प्रकल्पातील शेतकऱ्यांकडून भूखंडाच्या वाढीव मूल्यांच्या कमाल ५० टक्के सुधार शुल्क (बेटरमेंट चार्जेस) आकारले जाणार होते. परंतु शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टिकोनातून आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी आग्रही भूमिका घेत अत्यल्प सुधार शुल्क करण्याची पुनर्मागणी केली होती. त्या अनुषंगाने सोमवारी दि. ०३ मार्च झालेल्या सिडको संचालक मंडळाच्या बैठकीत सुधारित शुल्क ०.०५ टक्के एवढे आकारण्याच्या प्रस्तावला मंजूरी झाली आहे. या निर्णयाने नैना प्रकल्पातील शेतकऱ्यांना आणि विकसकांना मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच नैना क्षेत्रातील रखडलेल्या पायाभूत सुविधांच्या कामांना लवकरच वेग मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. ग्रामस्थांचे जो पर्यंत समाधान होत नाही तो पर्यंत नैना प्रकल्पाला सहकार्य करणार नाही, शेतकऱ्यांचे हित जपूनच प्रकल्पाचे काम सुरू करा अशी रोखठोक भूमिका पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर व उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांनी घेतली आणि त्यानुसार शेतकऱ्यांचे प्रश्न शासन दरबारी मांडण्याचे काम त्यांनी केले. त्या अनुषंगाने ०३ जानेवारीला आमदार प्रशांत



ठाकूर यांनी सिडकोला पत्र देऊन तातडीने बैठकीचे आयोजन करण्याची मागणी केली होती. त्याप्रमाणे ०६ जानेवारीला सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या सोबत आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांची सिडको कार्यालयात बैठक पान २ वर...

## निर्घृणपणे झालेल्या हत्येच्या निषेधार्थ उरण येथे शिवसेनेतर्फे आंदोलन



**सा.रायगड लोकधारा वृत्त/उरण प्रतिनिधी :** शिवसेना शिंदे गटाचे उरण तालुकाप्रमुख महेंद्र पाटील आणि उरण शहर प्रमुख सुलेमान शेख यांच्या नियोजनाने उरण चार फाटा येथे बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख यांचा वाल्मिक कराडने निर्घृणपणे केलेल्या हत्येच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात युवा सेना सचिव रुपेश पाटील, उरण विधानसभा प्रमुख मनोज घरत, चाणजे विभागीय उपतालुकाप्रमुख प्रशांत म्हात्रे, उपतालुका प्रमुख हेमंत भोईर, चाणजे पंचायत समिती विभाग प्रमुख कृष्णा पाटील, नवघर विभाग प्रमुख गणेश घरत, महिला आघाडी चाणजे विभाग प्रमुख बेबीताई पाटील, नवघर विभागीय उपतालुका प्रमुख अमित ठाकूर, उलवे शहर प्रमुख संदीप वायंगणकर तसेच प्रथम शेठ पाटील, सुधीर पाटील, शंकर पाटील आणि असंख्य शिवसैनिक व स्थानिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.या आंदोलनाच्या माध्यमातून संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येचा तीव्र निषेध करण्यात आला आणि दोषींना फाशीची शिक्षा करण्याची मागणी करण्यात आली.

## उरणातील विशाखा पाटील यांच्या अप्रतिम फॅशन शो ने उरणकर भारावले




**सा.रायगड लोकधारा वृत्त/उरण प्रतिनिधी :** उरणच्या टाउनशिप येथील मल्टीपर्पज हॉलमध्ये उरणच्या सुप्रसिद्ध कलाकार विशाखा पाटील (पागोटे) यांनी ३० पेक्षा जास्त कलाकार घेऊन अप्रतिम फॅशन शो संपन्न केला.या शोचे उद्घाटन द्रोणागिरी स्पोर्टसचे अध्यक्ष महादेव घरत यांच्या हस्ते झाले.यावेळी रायगडभूषण प्रा. एल.बी.पाटील, मिसेस इंडिया क्वीन स्वेता राजकुमार, उप सरपंच करिश्मा पाटील, सुनिता पाटील, आदिराज पाटील, प्राजक्ता पाटील, समृध्दी पाटील, महेश पाटील, सतीश पाटील आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महादेव घरत म्हणाले की उरणमधील हा शो पान २ वर...

## उरण पंचायत समितीच्या शिक्षण विभागात भ्रष्टाचार?

### पेन्शन मंजुरीसाठी सेवानिवृत्त शिक्षकांमध्ये संताप व्यक्त



**सा.रायगड लोकधारा वृत्त/उरण प्रतिनिधी :** उरण पंचायत समितीच्या शिक्षण विभागात पैसे दिल्याशिवाय कोणतेही काम होत नसल्याचा आरोप सेवानिवृत्त शिक्षकांकडून करण्यात आला आहे. निवृत्तीनंतर पेन्शन मंजुरीसाठी शिक्षकांना अनेकदा पंचायत समितीच्या शिक्षण विभागाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत.पेन्शनसाठी आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर शिक्षकांना वाटते की आता पेन्शन मंजूर होईल, परंतु शिक्षण विभागातील अधिकारी वर्ग त्यांच्याकडून पैशांची मागणी केली जाते. पैसे दिल्यास फाईल तातडीने पुढे पाठवली जाते, मात्र पैसे न दिल्यास ती प्रकरणे दडपून ठेवली जात असल्याचा धक्कादायक आरोप काही सेवानिवृत्त शिक्षकांनी केला आहे. याबाबत संबंधित विभागाशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही. मात्र याबाबत प्राथमिक शिक्षक वर्गाकडे विचारणा केली असता त्यांनी याला दुजोरा देत, सेवानिवृत्त शिक्षकांची कामे सर्व कागदपत्रे ओके असूनही मानपान झाल्याशिवाय काम पूर्ण होत नसल्याचे सांगतात. या भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवत जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने तातडीने हस्तक्षेप करून संबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी सेवानिवृत्त शिक्षकांकडून होत आहे.

## सीकेटी महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धा






**सा.रायगड लोकधारा वृत्त/पनवेल प्रतिनिधी :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगु काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त) आणि मुंबई विद्यापीठ यांच्या समन्वयाने आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धा दिनांक ५ व ६ मार्च रोजी आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेचे सीकेटी कॉलेजचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के.पाटील यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेमध्ये ६ महाविद्यालयातील मुलींच्या ४ संघांनी व मुलांच्या ६ संघांनी सहभाग नोंदविला आहे. आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धेमध्ये डी. जी. रुपारेल कॉलेज, माटुंगा, चांगु काना ठाकूर आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल, आर. ए. पोतदार कॉलेज, माटुंगा, विवेकानंद कॉलेज, चेंबूर, जी.एन. खालसा कॉलेज, माटुंगा आणि पिल्लई कॉलेज, न्यू पनवेल इत्यादी महाविद्यालये सहभागी झाली आहेत. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही. बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नाक्ती व प्रा. प्रतिज्ञा पाटील, जिमखाना विभागाचे सर्व सदस्य यांनी विशेष मेहनत घेत आहेत.

# कंपन्यांच्या दूषित सांडपाण्यामुळे नद्या प्रदूषित

## आ.प्रशांत ठाकूर, आ.महेश बालदी यांनी वेधले विधिमंडळाचे लक्ष





**सा.रायगड लोकधारा वृत्त/ पनवेल प्रतिनिधी :**
पनवेल । ठाणे व रायगड जिल्ह्यातील एमआयडीसीमधील अनेक कंपन्यांतून सोडण्यात येणाऱ्या रसायन मिश्रित पाण्यामुळे नद्यांच्या प्रदूषणात वाढ झाल्याबाबत आ. प्रशांत ठाकूर व आ. महेश बालदी यांनी मुंबईत सुरु असलेल्या विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रश्न दाखल करून या विषयावर शासनाचे लक्ष वेधले. पनवेल तालुक्यातील तळोजा एमआयडीसीतील घातक व रसायन मिश्रीत पाणी कासाडी नदीत सोडणे तसेच ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, बदलापूर, टिटवाळा, उल्हासनगर, डोंबिवली येथील एमआयडीसीमधुन अनेक कंपन्या तसेच जिन्स वॉश करणाऱ्या कंपन्या रसायन मिश्रीत पाणी बालधुनी व उल्हासनदीत सोडत असल्याने नदीच्या प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन नागरिक तसेच शेती व जलचर प्राण्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच, पेण तालुक्यातील डोलवी येथील धरमतर खाडीच्या बाजुला जे.एस.डब्ल्यू कंपनी तसेच अलिबाग तालुक्यातील शहाबाज येथील पी.एन.पी कंपनीतील रसायन मिश्रित दूषित पाण्यामुळे मच्छिमारी व्यवसाय धोक्यात आला आहे. त्या अनुषंगाने याबाबत अभ्यास करण्यासाठी वरिष्ठ वैज्ञानिक तथा वैज्ञानिक कारभार प्रमुख, केंद्रिय सागरी मत्स्यकी संशोधन संस्था मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे. या सर्व ठिकाणच्या नद्यांचे प्रदूषण रोखण्याबाबत अनेक लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी वेळोवेळी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे व प्रशासनाकडे तक्रार व निवेदने दिले असून यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली. तसेच या सर्व प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन प्रदूषण रोखणे तसेच यास जबाबदार असणाऱ्या कंपन्या व दोषी अधिकारी, कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी अधिवेशनात दाखल केला होता. राज्याच्या पर्यावरण व वातावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी या प्रश्नावर दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले कि, तळोजा एमआयडीसीतील घातक व रसायन मिश्रीत पाणी कासाडी नदीत सोडणे आणि ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, बदलापूर, टिटवाळा, उल्हासनगर, डोंबिवली येथील एमआयडीसीमधुन अनेक कंपन्या तसेच जिन्स वॉश करणाऱ्या कंपन्या रसायन मिश्रीत पाणी बालधुनी व उल्हासनदीत सोडले जात असल्याने नदीच्या प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन नागरिक तसेच शेती व जलचर प्राण्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे निदर्शनास आल्याची बाब अंशतः खरी आहे. तळोजा औद्योगिक वसाहतीमधील औद्योगिक सांडपाणी भूमिगत पाईपलाईनद्वारे सी.ई.टी.पी. मध्ये एकत्रित करून राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेमार्फत निर्देशित स्थळी विसर्ग करण्यात येते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सामुहिक सांडपाणी यंत्रणेची वेळोवेळी पाहणी करण्यात येते व सामूहिक सांडपाणी यंत्रणेमध्ये त्रुटी आढळून आल्यास संबंधितांना कारणे दाखवा नोटीस तसेच प्रस्तावित निर्देश बजावण्यात येतात. मत्स्यव्यवसाय विभागाकडून प्राप्त अहवालानुसार धरमतर खाडीतील मच्छीमारांच्या समस्या तसेच सागरी किनारपट्टीवरील प्रदूषणामुळे मत्स्योत्पादनावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करण्यासाठी दि. २१ फेब्रुवारी २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार दहा सदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीच्या अद्यापपर्यंत एकूण १० बैठका पार पडल्या आहेत. सदर समितीमार्फत धरमतर खाडीची पाहणी करून धरमतर खाडीतील मच्छीमारांची माहिती संकलित करण्याची कार्यवाही सुरू आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे नदी प्रदूषणाविषयी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पाहणी करण्यात येते व नियमानुसार वेळोवेळी आवश्यक ती कारवाई करण्यात येते, असे नामदार पंकजा मुंडे यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हंटले आहे.

पान १ वरून

## सुधारित शुल्कातून शेतकऱ्यांना मोठा दिलासा

झाली होती. यावेळी बेटरमेंट चार्जेस अत्यल्प करणे, ४०-६० धोरण ऐवजी ५०-५० असे प्रमाण करावे, ४२ गावातील ५०३८ घरे/बांधकामावर तोडक कारवाईचा अपप्रचार, शेतकऱ्यांना त्यांच्याच जागेवर भूखंड द्यावेत यासह शेतकऱ्यांच्या इतर प्रश्नावर जोर देत आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी प्रथम शेतकऱ्यांना न्याय त्यानंतर पुढील कार्यवाही करा अशी सूचना वजा मागणी या बैठकीत केली. बेटरमेंट चार्जेस कमी करण्यासंदर्भात सिडको स्तरावर सकारात्मक निर्णय घेता येणार आहे, त्यामुळे हा निर्णय तातडीने घेण्यात यावा, अशी मागणी या बैठकीत करण्यात आली होती. त्या नुसार या संदर्भात योग्य निर्णय घेणार असल्याचे सिडकोचे उपाध्यक्ष विजय सिंघल यांनी दोन्ही आमदार महोदयांना आश्वासित केले होते. त्या अनुषंगाने सोमवारी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत सर्व नगर रचना परियोजनामधील सुधार शुल्क कमी करुन शेतकऱ्यांच्या या महत्वपूर्ण प्रश्नावर सकारात्मक मार्ग निघाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना याचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. नैना क्षेत्रातील शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी सिडको व सरकार दरबारी कायम पाठपुरावा केला आहे. सुधार शुल्काचा महत्वपूर्ण प्रश्न निकाली लागल्याने शेतकऱ्यांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

## उरणातील विशाखा पाटील यांच्या अप्रतिम फॅशन शो ने उरणकर भारावले

मोठ्या स्वरूपात होत असून पागोटे गावच्या तरुणीने फार मोठे आणि यशस्वी पाऊल उचलले आहे.स्वेता राजकुमार यांनी फॅशन डिझायनर विशाखासह इतर कलाकारांना मार्गदर्शन करताना सांगितले कीतरुणाईसाठी फॅशन शो, मॉडेल ही चांगली क्षेत्रे असून त्यामध्ये सहभागी व्हावे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतीश पाटील यांनी अतिशय लाजबाब करून देखणा आणि रेखीव शो केला.शोसाठी प्रेक्षकांची मोठी उपस्थिती होती.ऋषिकेश पाटील आणि मित्र परिवारानें उत्तम आयोजन केले.प्रेक्षकांची मोठी दाद व मोठ्या प्रमाणात उपस्थिती पाहून विशाखा पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.

## उरणातील विशाखा पाटील यांच्या अप्रतिम फॅशन शो ने उरणकर भारावले

मोठ्या स्वरूपात होत असून पागोटे गावच्या तरुणीने फार मोठे आणि यशस्वी पाऊल उचलले आहे.स्वेता राजकुमार यांनी फॅशन डिझायनर विशाखासह इतर कलाकारांना मार्गदर्शन करताना सांगितले कीतरुणाईसाठी फॅशन शो, मॉडेल ही चांगली क्षेत्रे असून त्यामध्ये सहभागी व्हावे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतीश पाटील यांनी अतिशय लाजबाब करून देखणा आणि रेखीव शो केला.शोसाठी प्रेक्षकांची मोठी उपस्थिती होती.ऋषिकेश पाटील आणि मित्र परिवारानें उत्तम आयोजन केले.प्रेक्षकांची मोठी दाद व मोठ्या प्रमाणात उपस्थिती पाहून विशाखा पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.

# पनवेलमध्ये सराईत चोराच्या मुसक्या आवळल्या

## गुन्हे शाखा कक्ष २ ची कारवाई; साथीदार फरार, शोध सुरु



**सा.रायगड लोकधारा वृत्त/ पनवेल प्रतिनिधी :**
घरफोड्यांसह इतर अनेक गुन्हे ज्यांच्या नावावर असलेल्या एका टोळीतील सराईत गुन्हेगाराला गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलच्या पथकाने पाठलाग करून पकडले असले तरी त्याचे इतर साथीदार पसार झाल्याने त्यांना जेरबंद करणे हे पोलिसांसाठी मोठे आवाहन ठरणार आहे.पनवेल परिसरात घरफोडी व अन्य काही गुन्ह्यातील काही संशयित आरोपी हे दरोडा टाकण्याच्या उद्देशाने वाशीत असल्याची माहिती गुन्हे शाखा परिमंडळ दोनच्या युनिटला मिळाली. या माहितीच्या आधारावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गवळी यांच्या नेतृत्वाखाली सपोनि प्रवीण फडतरे, पोउनि. मानसिंग पाटील, माधव इंगळे, आदींचे पथक तात्काळ वाशीतील मिनी सी शोर परिसरात दाखल झाले. संशयित एका गाडीत असल्याचे समजताच या गाडीचा पाठलाग पोलिसांनी सुरू केला. पोलिसांची चाहूल लागताच या संशयितांनी गाडी सागर विहार कडे वळवली. मात्र रस्ता माहिती नसल्याने सेक्टर आठ येथील नर्सरीकडे वळवली पुढे रस्ता बंद आहे. नेमके त्याच्या गाडीच्या स्टेअरिंग रॉड तुटल्याने गाडी एका ठिकाणी आदळली. त्यांना पोलिसांनी शरण येण्यास सांगितले. परंतु त्यांनी त्यांची तवेरा गाडी पोलीस पथकाच्या अंगावरुन घालून त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे त्या भागातील इतर दोन खाजगी वाहनांना धडक मारुन त्या गाड्यांचे नुकसान केले व त्या संशयितांनी येथील गर्द कांदळवनाचा आधार घेत पळून गेले. मात्र पोलिसांनी थेट जंगलात घुसून शोध मोहीम सुरू केली. मात्र गर्द झाडी आणि ड्रोन कॅमेराच्या सीमा असल्याने फारसे हाती लागले नाही. तसेच घटनास्थळी श्वान पथक दाखल झाले होते. व त्यांनी या टोळीतील सराईत गुन्हेगार परमजित पोमण सिंग याला ताब्यात घेतले आहे. तसेच त्याचे सहकारी सरदार, नेपाली थापा, नेपाली व हसन याचा मित्र अशा एकूण ५ जणांचा शोध सुरू केला आहे. दरम्यान, या गुन्ह्यात वापरणारी लाल रंगाची तवेरा गाडी तसेच गाडीमध्ये स्क्रु ड्रायव्हर, पक्कड, कटावणी, लोखंडी रॉड, हायड्रोलिक कटर, रस्सी बंडल, गोणपाटाच्या गोणी, मोठ्या पिशव्या, हॅण्डग्लोज, कैचीचे पाते, ३ मिरची पुडची पाकीटे असे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे.

# जेएसएम महाविद्यालयाचे माजी प्रा. अविनाश ओक यांची आत्महत्या



**सा.रायगड लोकधारा वृत्त/**
**अलिबाग । विशेष प्रतिनिधी :** तालुक्यातील जेएसएम कॉलेजचे माजी प्राध्यापक अविनाश ओक (वय.६५) यांनी रेल्वेखाली आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी (दि.५) दुपारच्या सुमारास घडली. पेण रेल्वे स्टेशन येथील रुळावर त्यांचा मृतदेह सापडला. यावेळी 'माझ्या आत्महत्येला कोणालाही दोषी धरु नये, अशी सुसाईड नोट पोलिसांना त्यांच्याजवळ सापडली. पेण येथील सरकारी रुग्णालयात ओक यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले, असल्याची माहिती पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदिप बागुल यांनी 'सा.रायगड लोकधारा'शी बोलताना दिली. ही घटना दुपारी दीड ते दोन वाजण्याच्या सुमारास घडली. ही बातमी समजताच ओक यांचे निकटवर्तीय तसेच भाजपचे नेते किरिट सोमय्या पेणमधील रुग्णालयात दाखल झाले. ओक यांच्या पश्चात त्यांची पत्नी, मुलगा, सून आणि मुलगी असा परिवार आहे.प्रा. ओक यांनी अलिबाग येथील जेएसएम महाविद्यालयामध्ये बरीच वर्ष प्राध्यापक म्हणून काम केले होते. ते अलिबाग-गोंधळपाडा येथे वास्तव्यास होते. पेण येथील गतीमंद मुलांसाठी काम करणारी आयडे केअर ही संस्था आहे. या संस्थेमध्ये ते सेवाभावीपणे काम करण्यासाठी जात असत. बुधवारीदेखील ते आयडे केअरमध्ये गेले होते. त्यांनतर आयडे केअरच्या स्वाती मोहिते यांनी त्यांना जेवणासाठी आग्रह केला होता.

# घरफोडीप्रकरणी पेण येथील हरिश्चंद्र उर्फ गुड्डू म्हात्रे अटकेत



**सा.रायगड लोकधारा वृत्त/**
**पेण प्रतिनिधी :** पेण पोलीस ठाणे हद्दीतील काश्मिरे गावात वारंवार घरफोडी चोऱ्या करून अज्ञात चोराकडून हैदोस घालण्यात आला होता. यामुळे गावात भीतीचे वातावरण पसरले होते. नुकतेच पेण पोलिसांनी गुड्डू नामक चोरास शिताफीतीने पकडून अटक केली आहे. ऑनलाइन रम्मी खेळायचे नाद लागलेल्या काश्मीरे गावातील आरोपी हरिश्चंद्र उर्फ गुड्डू बाळकृष्ण म्हात्रे वय २७ वर्षे, रा.काश्मिरे, पो.कांदळेपाडा याला अटक करण्यात आली होती. त्याला पोलिसांनी पोलीसी खाक्या दाखविल्यानंतर त्याने पेण पोलीस स्टेशन हद्दीत अजून ४ गुन्हे केल्याचे कबुल केले. सदर गुन्ह्याचा तपास उप विभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक संदिप बागुल यांच्या सुचनेनुसार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक समद बेग, राजेश पाटील, राजेंद्र भोंडकर, प्रकाश कोकरे, अमोल म्हात्रे, गोविंद तलवारे, संतोष जाधव, सुशांत भोईर यांनी कौशल्यपुर्ण तपास करून यश मिळवल्याने सर्व स्तरातून पेण पोलिसांचे कौतुक करण्यात येत आहे.

रायगड लोकधारा

३४१ कोटीहून अधिक मालमत्ता कर जमा

चार दिवसांत साडेपाच कोटींचा भरणा

# पनवेल महापालिकेच्या तिजोरीत खणखणाट

**सा.रायगड लोकधारा वृत्त/पनवेल प्रतिनिधी :** चालू आर्थिक वर्षामध्ये पनवेल महानगरपालिकेच्या तिजोरीत ३४१ कोटीहून अधिक मालमत्ता कर जमा झाला आहे. मालमत्ता कर हा महापालिकेचा एकमेव आर्थिक स्त्रोत असून आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या काही महिन्यांपासून नागरिकांनी मालमत्ता लवकरात लवकर भरावा, असे आवाहन करण्यात येत होते. त्याचा हा सकारात्मक परिणाम दिसून येत असून पालिकेच्या तिजोरीत खणखणाट असल्याचे पाहायला मिळत आहे. ३१ मार्च ही मालमत्ता कर भरण्याची शेवटची तारीख असल्यामुळे व मालमत्ता कराच्या शास्तीमध्ये दरमहा दोन टक्क्यांची वाढ होत असल्याने नागरिक मोठ्या प्रमाणात आपला मालमत्ता कर भरतात. गेल्या चार दिवसापांसून दररोज




महापालिकेच्या तिजोरीत १ कोटीहून अधिक रक्कमेची भर पडत आहे. गेल्या चार दिवसांत एकुण भरणा ५ कोटी ५६ लाखांचा भरणा झाला आहे.

## ऑनलाईन भरणा करण्याचे आवाहन

महापालिकेने मालमत्ताधारकांना मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी 'पीएमसी टॅक्स' हा मोबाईल ॲप विकसित केला आहे. तसेच, मालम त्ताधारकांना नावामध्ये बदल करायचा असल्यास महापालिकेच्या 'पीएमसी टॅक्स' या मोबाईल ॲपच्या माध्यमातून करता येणार आहे. या ॲपमध्ये नाव बदलाकरता विनंती केल्यास महापालिकेकडून नाव बदलानंतर संबधितांना नोटिफिकेशन मिळणार आहे. त्याचबरोबर्‌. रिर्पीशश्रलेीस या संकेतस्थळावरून मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. काही शंका असल्यास १८००५३२०३४० या टोल फ्री क्रमांकावरती संपर्क साधावा, असे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

# कृषी उत्पन्न फळ बाजारात आरोग्याशी खेळ

## शिजवलेले अन्न उघड्यावर; तर बाजार आवारात घाणीचे साम्राज्य

**सा.रायगड लोकधारा वृत्त/नवी मुंबई प्रतिनिधी :** मुंबई कृषी उत्पन्न फळ बाजारात आता रमजान निमित्ताने मोठ्या प्रमाणावर फळांचा हंगाम सुरू झाला आहे. तसेच हापूसचा हंगामाही सुरु होत आहे. त्यामुळे बाजारात मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण होत आहे. मात्र बाजारात या कचऱ्याचे नियोजन होत नसून दोन-तीन दिवस कचऱ्याचे ढीग साचत आहेत. त्यामुळे परिसरात घाणीचे साम्राज्य आणि दुर्गंधी असल्याने बकालपणा आला आहे. फळ बाजारातील हापूस निर्यात होणाऱ्या इमारती जवळच कचऱ्याचे ढीग साचत आहेत. तसेच या समोरील असणाऱ्या उपहारगृहामध्ये शिजवलेले अन्न उघड्यावर ठेवून एकंदरीत बाजार घटकांच्या आरोग्याशी खेळले जात आहे. यावर एपीएमसी प्रशासन काय कारवाई करणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नवी मुंबई शहरात काही वर्षांपूर्वी ठिकठिकाणी कचराकुंड्या होत्या. परंतु बहुतांशी ठिकाणी कचरा रस्त्यावरच अस्ताव्यस्त टाकला जात होता. त्यामुळे रस्त्यावर आणि परिणामी त्या विभागात दुर्गंधी आणि घाणीचे साम्राज्य होते. स्वच्छता सर्वेक्षण अभियानाअंतर्गत गेल्या काही वर्षांपासून शहरातील कचरा कुंड्या हटविण्यात आल्या. त्याऐवजी आता कचरा वाहन नेण्यासाठी घंटा गाडी सुरू करण्यात आलेली आहे.



त्यामुळे नवी मुंबई शहरातील रस्ते मोकळा श्वास घेत आहेत. मात्र आजही एपीएमसीत आणि बाजाराबाहेरील रस्त्यावर कचऱ्याचे ढीग आढळत आहेत. पीएमसी बाहेर अनधिकृत फेरीवाले बसून त्याच ठिकाणी सडलेली, खराब झालेली भाजी, फळे, अन्य कचरा रस्त्यावरच टाकून जातात. त्यामुळे या परिसरात नेहमीच दुर्गंधी आणि घाणीचे दृश्य असते. तर एपीएमसीच्या अंतर्गत भागात देखील वेळोवेळी कचरा न उचलल्यामुळे कचऱ्याचे ढीग पहावयास मिळतात. त्यामुळे येथे येणाऱ्या ग्राहकांना तसेच बाजार घटकांना नाक मुठीत धरून वावरावे लागते. उपहारगृहात अन्नपदार्थ उघड्यावर फळ बाजारातील या निर्यात भवन इमारती समोर असलेल्या उपहारगृहाला जेवढी जागा देण्यात आली होती, त्याव्यतिरिक्त अधिक पटीने अतिक्रमण करून जागेचा वापर सुरू आहे. शिवाय या ठिकाणी उघडपणे शिजवलेला भात टेबलवर टाकण्यात आल्याचे दिसून येत आहेत. याच परिसरात कचऱ्याचे साम्राज्य असल्यामुळे या ठिकाणी माशा तसेच उंदरांचा उपद्रव देखील आहे. त्यामुळे उपहारगृहामध्ये येणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याशी खेळले जात आहे.

> एपीएमसीतील कचरा नियोजनाबाबत येत्या संचालक मंडळाच्या बैठकीत विषय पटलावर घेण्यात येणार आहे. तसेच उपहारगृहामध्ये उघड्यावर ठेवलेल्या अन्नाबाबत चौकशी करून अहवाल मागविण्यात येणार आहे.- **पी. एल. खंडागळे,सचिव, एपीएमस**

## जिल्हा रुग्णालयाच्या भूमीपूजनाला

# भाजप व राष्ट्रवादीच्या नेत्यांनी दांडी

सा.रायगड लोकधारा वृत्त/

**अलिबाग प्रतिनिधी** : अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयाची इमारत ४५ वर्षे जुनी आहे. ही इमारत जीर्ण झाल्याने रुग्णांसह कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता. या ठिकाणी नवीन इमारतीची प्रतीक्षा रायगडकारांना लागून राहिली होती. अखेर या इमारतीच्या बांधकामाच्या भूमीपूजनाला मुहूर्त लागला. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते अलिबागमध्ये बुधवारी (दि.५) सायंकाळी भूमीपूजन झाले. मात्र या भूमीपूजनाला सत्ताधारी पक्षातील भाजप व राष्ट्रवादीच्या नेत्यांनी दांडी मारली. त्यामुळे सत्ताधारी पक्षातील भाजप, राष्ट्रवादी व शिंदे गटात आलबेल नसल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. या कार्यक्रमाला भाजपचे खा. धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आ. महेश बालदी, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दांडी मारली. फक्त शिंदे गटातील नेतेच या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यामुळे महायुतीमधील अंतर्गत वाद पुन्हा चव्हाट्यावर आल्याची चर्चा कार्यक्रमादरम्यान सुरु होती. सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत अलिबागमध्ये ३०० खाटांचे नवीन रुग्णालय उभारण्यात येणार आहे. तळमजल्यापासून सात मजली ही इमारत असणार आहे. या इमारतीच्या बांधकामासाठी १०५ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता आहे. या इमारतीचे बांधकाम १७ हजार ८०० चौ. मी. इतक्या क्षेत्रफळात आहे. नोंदणी कक्ष, ब्लड बँक, शस्त्रक्रिया सेंटर, अपघात विभाग, अतिदक्षता विभाग, डायलिसिस सेंटर, प्रशासकीय कार्यालय आदी सुविधा असणार आहे. या नवीन आंतररुग्ण इमारतीचा भूमीपूजन सोहळा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या प्रमुख



उपस्थितीत बुधवारी सायंकाळी झाला. यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, आ.महेंद्र थोरवे, आ.संतोष बांगर, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शितल जोशी व इतर उपस्थित होते. रायगड जिल्ह्यात सध्या पालकमंत्री पदावरून वाद सुरू आहे. हे पद मिळविण्यासाठी शिंदे गटातील नेते भरत गोगावले आणि राष्ट्रवादीचे तटकरे यांच्यामध्ये शीतयुध्द सुरु आहे. मात्र सर्वच आलबेल नसल्याचे बोलले जात असताना भूमीपूजनाच्या कार्यक्रमाला भाजप व राष्ट्रवादीच्या नेत्यांनी दांडी मारल्याने वेगळ्याच चर्चेला ऊत येऊ लागला आहे.

### गोगावलेंच्या निशाण्यावर तटकरे?

● रायगड जिल्ह्यातील पालकमंत्रीपदाचे बाशिंग बांधून फलोत्पादन मंत्री भरत गोगावले आहेत. मात्र त्यांना राष्ट्रवादीच्या नेत्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे डोईजड ठरत आहेत. आदिती तटकरे यांना पालकमंत्रीपद मिळू नये, यासाठी शिंदे गटातील नेते जिवाची बाजी लावत आहेत. त्यामुळे पालकमंत्रीपदाचा वाद गेल्या अनेक दिवसांपासून सुरूच आहे. विधानसभेची निवडणूक कठीण होती. मित्र पक्षाने काय मदत केली, हे विसरून पुढे काम करू, असा टोला भरत गोगावले यांनी नाव न घेता लगावला. त्यामुळे गोगावलें च्या निशाण्यावर पुन्हा तटकरे असल्याचे दिसून आले आहे.

### महायुतीमधील वाद चव्हाट्यावर

### पालकमंत्री पदावरून ठिणगी

# किरवली पाणी प्रश्न पेटला


## महिलांचा डोक्यावर हंडा घेत मोर्चा

सा.रायगडलोकधारा वृत्त/

**कर्जत प्रतिनिधी** : कर्जत किरवली ग्रामपंचायत हद्दीत ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू लागली आहे. २५ ते ३० वर्षे लोटली तरी येथील पाण्याची समस्या काय सुटलेली नाही. त्यामुळे स्थानिकांनी वारंवार लोक प्रतिनिधींवर नाराजी व्यक्त करून दाखवली आहे. यावेळी हे प्रकरण चांगलेच चिघळले आहे. दरम्यान, गेल्या चार दिवसांत येथील महिलांनी डोक्यावर हंडा घेत दुसऱ्यांदा कर्जत पंचायत समितीवर मोर्चा काढला हो ता. यावेळी 'पाणी द्या, नाहीतर खूर्चा खाली करा', अशा घोषणा देत थेट अधिकाऱ्यांवर रोष व्यक्त करण्यात आला. कर्जत तालुक्यातील ग्रामस्थ हे पाणी समस्येने हैराण झालेले आहेत. यासंदर्भात दरवेळी संबंधित कार्यालयावर मोर्चे काढले जात आहेत. तरीदेखील अधिकरी व लोकप्रतिनिधी यांच्याकडून कोणताच तोडगा काढण्यात येत नाही. दरम्यान, १ मार्च रोजी स्थानिक महिलांनी पंचायत समिती आणि आ. महेंद्र थोरवे यांची भेट घेण्यासाठी धाव घेतली होती. परंतु, पंचायत समितीवर अधिकारी उपलब्ध नव्हते तर आमदार देखील कामानिमित्ताने बाहेर असल्याने महिलांचा पाणी प्रश्न बारगळला होता. त्यामुळे पुन्हा बुधवारी (दि.५) या महिलांनी दुसरे आंदोलन करून थेट पंचायत समितीवर हंडा मोर्चा चढवला. यावेळी रिकामा हंडा डोक्यावर घेऊन प्रशासनाची खिल्ली उडवत अकार्यक्षम अधिकाऱ्यांचा भ्रष्ट कारभार देखील चव्हाट्यावर आणला आहे. यावेळी पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी बोरवेल खोदून पाणी समस्या मिटवण्याची तयारी दाखवली आहे. एकूणच किरवली येथील महिलांनी आंदोलनाचे हत्यार उपसले असले तरी त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासन किती गांभीर्य घेते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.



# गटारातील पाण्यात करावी लागतेय अंघोळ



सा.रायगड लोकधारा वृत्त/**उरण वार्ताहर** : जेएनपीए बंदरातून देश परदेशात मालाची आयात -निर्यात करण्याचे महत्त्वाचे काम हे कंटेनर ट्रेलर, ट्रक वाहनांचे चालक करत आहेत. त्यामूळे मोठ्या प्रमाणात देशाला आर्थिक चलन हे बंदरातील व्यवस्थापन तसेच वाहन चालकांच्यामुळे मिळत असते. परंतु, त्या वाहन चालकांना जेएनपीए बंदर परिसरातील गटारातील पाण्यात अंघोळ करण्याची वेळ येत आहे. असे असेल तर हे दुदैवच म्हणावे, अशी प्रतिक्रिया जनमानसात उमटत आहे. देशाला आर्थिक चलन मिळवून देणारे जेएनपीए बंदर व त्या बंदराच्या देखरेखीखाली याठिकाणी निर्माण झालेले इतर खासगी बंदर तसेच कंटेनर गोदामे आहेत. या ठिकाणांहून देश-परदेशात मालाची आयात-निर्यात करण्याचे महत्त्वाचे काम हे कंटेनर ट्रेलर, ट्रक वाहनांचे चालक करत आहेत. अशा वाहन चालकांच्या आरोग्याची तसेच त्यांना सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम हे बंदर व्यवस्थापन व कंटेनर गोदामाचे मालकांचे आहे. परंतु, तसे होताना दिसत नाही. त्यांना उघड्यावरील अन्न खावे लागत आहे. त्याचबरोबर वाहन चालकांना गटारातील घाणीच्या पाण्यात अंघोळ करण्याची वेळ येऊन ठेपल्याचे भयानक चित्र समोर येत आहे. तरी देशाला आर्थिक चलन मिळवून देण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या कंटेनर ट्रेलर ट्रक वाहन चालकांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बंदर व्यवस्थापन व गोदाम मालकांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शिवाजी ठाकूर यांनी केली आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, विजय चंद्रकांत गायकर यांनी रोशन प्रिंटर्स, शॉप नं.०४ / ०५, प्रकाश निवास, प्लॉट नं.१३४/ ०१, आगरी समाज हॉल जवळ, पनवेल, रायगड महाराष्ट्र - ४१० २०६ येथे छापून मु. पो. पोयंजे, ता. पनवेल , जि. रायगड, महाराष्ट्र - ४१० २०६ येथून प्रकाशित केले. लेखांतून व्यक्त होणाऱ्या मतांशी संपादक सहमत असतीलचं असे नाही. सर्व वाद पनवेल न्याय कक्षेत. ( ८३६९३९४३७२ / ९१३६५३९५६० ) / Facebook :- vijay gaikar / Whatsapp No. ९१३६५३९५६० /
संपादक : विजय चंद्रकांत गायकर Email Id :- Gaikarvijay26@gmail.com RNI No. MAHMAR/2013/48622